Vol 2 Issue 3 Sept 2012

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 3, Sept. 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

RESEARCH PAPER

GRT

# महिला बचत गट चळवळीचा इतिहास

**अनिल माणिकराव बैसाणे**

इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

**सारंशः—**

आज जगातील सर्वच देशांमध्ये महिलांच्या समस्यांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे. त्यातल्या त्यात मागास आणि विकसनशील देशांमधील महिलांच्या समस्या अधिक गंभीर आहेत. त्यांच्या या समस्यांना एकमेव प्रमुख कारण हे आर्थिक परिस्थिती आहे. त्यामुळे महिला जर आर्थिक दृष्टीने सक्षम झाल्यात तर सर्वच समस्यांचा निचरा होईल. याकरिताच सर्वच देशांमध्ये महिलांच्या सक्षमीकरणाकरिता अशासकीय पातळीवर प्रयत्न सुरू झाले आहेत. आणि दारिद्र्य निर्मूलन हे महत्त्वाचे उद्दिष्टे समोर ठेवले गेले. या दृष्टिकोनातून व्यापक विचार झाला असता महिलांच्या सक्षमीकरणाकरिता दारिद्र्यनिर्मूलनाच्या वाटचालीचे दिव्य पार पाडण्याकरिता महिला बचत गटांची भूमिका ही महत्त्वपूर्ण असल्याचे दिसते. म्हणूनच सर्वत्र बचत गटांच्या प्रक्रियेला गती आली. म्हणूनच सन 2005 पासून यूनोच्या मानवी हक्क आयोगानेसुद्धा मदत सुरू केली.

**प्रस्तावनाः—**

बचतगट चळवळीत बांगला देशाचे डॉ. महंमद युनूस यांची भूमिका फारच महत्त्वपूर्ण राहील्याने त्यांना सन 2006 मधील नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. आपल्या देशात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून महिला सबलीकरणासाठी दारिद्र्य निर्मूलनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. स्वयंम सहाय्यता बचत गटांना सुवर्ण जयंती ग्राम रोजगार योजनेमार्फत प्रोत्साहने देण्यात आले. दारिद्र्यरेषेखालील घटकांना अल्पदरात कर्जपुरवठा करण्यात आला. तर 7 व्या पंचवार्षिक योजनेत बचत गटांना मोठी मदत झाल्याने ग्रामीण व शहरी भागातील महिला सक्षमीकरणास चालना मिळाली. आज बचत गटांच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक परिस्थितीत अपेक्षित सुधारणा घडून येण्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

### बचत गट चळवळीत डॉ. महम्मद युनूस यांचे योगदान

बांगला देशीय डॉ. महम्मद युनूस यांनी अर्थशास्त्र या विषयात पदवी संपादन केल्यानंतर शिक्षकी पेशा पत्करला. सन १९६५ मध्ये त्यांनी अमेरिकेतील हॉवर्ड विद्यापीठात पीएच्. डी. ह्या उच्च पदवीचा सन्मान प्राप्त केला. सन १९७१ च्या स्वातंत्र्य युद्धात उध्वस्त झालेल्या बांगला देशासमोर अनेक समस्या होत्या. याकरिता बांगला शासनाने डॉ. युनूस यांची नियोजन आयोगावर नियुक्ती केली. मात्र शासनाकडे कोणताही कार्यक्रम नसल्याने त्यांनी आयोगाच्या अध्यक्षांकडे आपला राजीनामा दिला. यापुढे चितगाव विद्यापीठात अर्थशास्त्र विभागात विभाग प्रमुख म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली. चितगाव जिल्ह्यातील जोब्रा खेड्यातील डोंगराळ भागातील समाजजीवनाचा त्यांनी सखोल अभ्यास केला. येथील सामान्य जनतेच्या हालाखीच्या परिस्थितीकडे विद्यापीठाचे लक्ष वेधून उपाय योजना सूचविल्यात.[१] विद्यापीठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसह ह्या विभागातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून कृषी क्षेत्रात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. श्चितगाव विद्यापीठ ग्रामीण विकास प्रकल्पाश्द्वारे ग्रामीण भाग विद्यापीठाशी जोडण्यात आला आणि त्याद्वारे ग्रामीण समाजजीवनाचा अभ्यास सुरू केला. यातून असे लक्षात आले की, 'ग्रामीण महिला ह्या सावकारी कर्ज फेडीकरिता उत्पादित माल त्याच

सावकारास अतिशय कमी किमतीत विकतात.[१] त्यांना जर किफायतशीर कर्ज उपलब्ध झाले तर उत्पादित मालाच्या विक्रितून जास्त नफा मिळेल आणि त्यांचा आर्थिक स्तर उंचावेल. म्हणून अशा घटकांनी एकत्र येवून परस्पर सहकार्यातून विश्वासावर आर्थिक व्यवहारास गती दिली. याच प्रक्रियेतून डॉ. युनूस यांनी स्वयंम सहाय्यता बचत गटांची संकल्पना अमलात आणली.[२] जोब्रा भागात ग्रामीण बॅंकेची शाखा काढण्यात येवून गरीब होतकरू महिलांना विशिष्ट पद्धतीने बचत करण्यास लावल्यामुळे या बचतधारक महिलांना कर्ज मिळण्याची कुवत निर्माण केली. या चळवळीतूनच बचतगट, स्वयंम सहाय्यता गट, शेजार गट किंवा लघु वित्त या वेगवेगळ्या नावाने या संस्था प्रसिद्धीस आल्या. गरिब महिलांना ग्रामीण बॅंकेकडून प्रायोगिक तत्त्वावर विनातारण कर्ज मिळाल्याने गृहउद्योगाचे उत्पादन वाढून दारिद्रच निर्मूलनास मोठा हातभार लागला. यामुळे दारिद्ररेषेची पातळी ओलांडून महिला सक्षमीकरणास वेग प्राप्त झाला आहे.[३]

तसेच ग्रामीण बँकाच्या गृह निर्माण कर्ज योजनांद्वारे गरीब कुटूंबाना स्वतःची घरे मिळाली आहेत. होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देवून त्यांना विकासाच्या विविध संधी उपलब्ध करून दिली. महिलांसाठी लहान-लहान उद्योगधंद्यांसाठी विनातारण कर्ज उपलब्ध झाल्यामुळे दारिद्रच निर्मुलनाबरोबरच आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडून आली आहे. डॉ. महम्मद युनूस यांनी स्थापन केलेल्या ग्रामीण बॅंकेत महिलांचा मोठ्याप्रमाणात सहभाग राहीला आहे. आर्थिक विकासाबरोबरच महिलांच्या नेतृत्व गुणांचाही विकास करण्याकरिता प्रशिक्षणही दिले जाते. महत्त्वाचे म्हणजे या बॅंकेद्वारे गरीब महिलांबरोबरच भिकाऱ्यांनासुद्धा बिनव्याजी कर्जपुरवठा केला जातो.[४] भिकाऱ्यांनासुद्धा सक्षम बनविण्याची ही योजना म्हणजे बॅंकेचे एक वैशिष्ट्यच म्हटले पाहिजे. थोडक्यात या ग्रामीण बॅंकेद्वारे बांग्ला देशात अनेकविध मार्गांनी दारिद्रच निर्मुलनाचा कार्यक्रम यशस्वीपणे राबविल्याचे दिसते.

## *भारतातील महिला गट चळवळ*

आपल्या देशात स्वातंत्र्योत्तर काळात पंचवार्षिक योजनांद्वारे आर्थिक विकास आणि दारिद्रच निर्मूलनातून महिला सबलीकरणासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या असल्या तरी स्वयंम सहाय्यता बचत गटांना खऱ्या अर्थाने प्रोत्साहन सन १९९९ मध्ये सुरू झालेल्या सुवर्ण जयंती ग्राम योजनेतंर्गत मिळाले. भारतात सन १९८५ मध्ये म्हैसूर पुर्ननिर्धारण आणि विकास एजन्सी या संस्थेने बचत गट चळवळ सुरू केली. त्याकरिता पत व्यवस्थापन गट करण्यात आले आणि सन १९९० मध्ये डॉ. महम्मद युनूस यांना निमंत्रित करून पं. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली येथे बचत गटांकरिता त्यांच्या मार्गदर्शनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला. याचा परिणाम म्हणजे भारतातही महिला बचत गट चळवळीला मोठ्याप्रमाणात चालना मिळाली. सन १९९३ मध्ये तर रिझर्व बॅंकेने कायदेशीर मान्यताच देवून टाकल्याने मोठ्या प्रमाणत महिला बचत गट बॅंकांना जोडले गेलेत. सन १९९६ मध्ये रिझर्व बॅंकेने महिला बचत गटांना कर्ज पुरवठा करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करून या चळवळीस अधिकाधिक गतीमान करण्यात आले.[५]

आपल्या देशात महिला बचत गट चळवळीत स्वयंसेवी संस्थांचे मोठे योगदान आहे. यात व्यापारी बॅंका, प्रादेशिक ग्रामीण बॅंक, सरकारी बॅंक, यांच्याद्वारे कर्जपुरवठा करण्यात येतो. ६० टक्के कर्ज पुरवठा हा व्यापारी बॅंकाकडून होत असतो. म्हणूनच भरतात सन १९९९ ते २००५ या कालावधीत बॅंकांशी संलग्न बचत गटांची संख्या ४२, ५४, ९८५ इतकी झाली होती. या बचतगटांना १, ४५, ५१६ दशलक्ष कर्ज पुरवठा करण्यात आल्याची नोंद आहे.[६] यावरून आपल्या देशात दारिद्रच निर्मूलन कार्यात महिला बचत गट चळवळीचे मोठे योगदान असल्याचे दिसते.

## *महाराष्ट्रातील महिला बचत गट चळवळ*

भारतात पुरोगामी विचारसरणीचे राज्य म्हणून महाराष्ट्राला वेगळी ओळख आहे. महाराष्ट्रात ग्रामीण विकासाबरोबरच महिलांचा आर्थिक विकास व्हावा यासाठी इ.स.१९९४ मध्ये स्वतंत्र महिला धेरणाचा स्वीकार करण्यात आला. त्यामुळे महिलांच्या सबलीकरणासाठी स्वयंम सहाय्यता बचत गट चळवळीला चालना मिळाली. सन १९४७ मध्ये आपल्या राज्यात सासु-सुनांनी एकत्र येवून २५ पैसे बचतीचा गट तयार केला. पुढे १९७० मध्ये इलाबेन भट यांनी महिला व सुक्ष्म विज पुरवठा या विषयीची मांडणी केली. तसेच सन १९८४-८५ मध्ये गडचिरोलीतील वडसा तालुक्यात बचत गट चळवळ सुरू झाली. सन १९९४ मध्ये महाराष्ट्रातील चार जिल्ह्यातून बचत गट चळवळ राबविण्यात आली व ती जबाबदारी महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपविण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत महिला बचत गट चळवळीला सुरूवात होवून सुवर्ण जयंती ग्राम स्वयंम रोजगार योजनेअंतर्गत ग्रामीण भागात दारिद्रच निर्मुलनासाठी महिला बचत गटांना चालना मिळाली. महाराष्ट्रात ३५ जिल्ह्यात ही चळवळ सुरू असून सन २००५-०६ या वर्षात पुणे जिल्हा अग्रेसर राहीला आहे, तर दुसऱ्या क्रमांकावर चंद्रपूर आणि

तिसऱ्या क्रमांकावर नंदुरबार जिल्हा होता. तसेच चैतन्य संस्था, अन्नपूर्णा महिला मंडळ, महिला बाल व ग्रामीण विकास मंडळ इत्यादी संस्थामार्फत महिला बचत गट चालविले जातात. यात चैतन्य संस्थेची प्राधान्याने आगेकूच असून खा. सुप्रिया सुळे यांनी यशस्विनी प्रकल्पांतर्गत बचतगट चळवळीतून महिलांच्या विकासाचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे.[७]

थोडक्यात संयुक्त राष्ट्र संघटनेने दारिद्र्यता मुक्त जगाचे उद्दिष्टे निश्चित केले असून त्याच्या परिपूर्तीकरिता सन २०१५ पर्यंत जगातील गरिबी ही निम्म्यावर आणण्याचा कृतीशील कार्यक्रमही घोषित केला होता. याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून डॉ. महम्मद युनूस यांनी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या या दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमात बांग्लादेश महत्त्वाची भूमिका बजावेल असा आत्मविश्वास व्यक्त केला आहे.

### *संदर्भग्रंथ*

१.पाटील शरद, (अनुवादक), बँक गरिबांच्या दारात, सुविधा प्रकाशन, सोलापूर, २००७, पृ.६६
२.मुलाणी डॉ. एम. यु, अल्पबचत नियोजन (बचत गट), डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००८, पृ.१४
३.मुलाणी डॉ. एम. यु., महिला स्वयं सहाय्यता बचत गट, डायमंड पब्लिकेशन, पुणे २००६, पृ.१०
४.चौधरी राजेश (संपा.), महिला बचत गट हस्तपुस्तिका, चौधरी पब्लिशेअर, पुणे, २००८, पृ. २१७
५.पाटील डॉ. विद्या, बचतगट कार्यपद्धती व प्रगती, सम्यकृता प्रकाशन, धुळे, २०१३, पृ. १५
६.मुलाणी डॉ. एम. यु, उपरोक्त क्र.३, पृ.१५
७.पाटील डॉ. विद्या, बचतगट महिला सक्षमीकरण, सम्यकृता प्रकाशन, धुळे, २०१३, पृ. ६७

***अनिल माणिकराव बैसाणे,***
इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org